# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईदर, वसई-विरार**

पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

**कार्यालयाचा पत्ता-** रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि. ठाणे फोन नंबर ०२२ - २९४५१००१

Email ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट ०२/२०२५ दि. ०१/०१/२०२५

## परिमंडळ १ मिरा रोड अंतर्गत ३१ डिसेंबर अनुषंगाने मोटर वाहन कायद्यान्वये करण्यात आलेल्या कारवाया व उपाययोजना

मिरा-भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालय परिमंडळ-१ अधिनस्त पोलीस ठाण्यात नुतन वर्ष स्वागत २०२५ च्या अनुषंगाने कोठेही अनुचित प्रकार घडु नये यासाठी परिमंडळ-१ अधिनस्त पोलीस ठाणे हद्दीत बंदोबस्त, पेट्रोलींग व २९ ठिकाणी नाकाबंदीचे आयोजन करण्यात आला होते. बंदोबस्त व नाकाबंदी करिता ७७ अधिकारी, ३१२ पोलीस अंमलदार, ५४ सुरक्षा रक्षक व ०१ आर.सी.पी.प्लाटुन लावण्यात आले होते.

बंदोबस्त व नाकाबंदीच्या वेळी दारु पिवुन गाडी चालवणाऱ्या २५ इसमांवर परिमंडळ १ अधिनस्त पोलीस ठाण्याकडुन तसेच वाहतुक विभाग काशिमीरा यांनी ३६ इसमांवर अशा एकुण ६१ इसमांवर ड्रंक अँड ड्राइव्हच्या कारवाई करण्यात आल्या. तसेच मोटर वाहन कायद्यान्वये परिमंडळ १ अधिनस्त पोलीस ठाण्याकडुन ९१ इसमांवर तसेच वाहतुक विभाग काशिमीरा यांनी ३९७ इसमांवर अशा एकुण ४८८ इसमांवर कारवाई करण्यात आली, अंमली पदार्थाचे सेवन करण्या-या ०५ इसमांवर एन.डी.पी.एस. कायदयान्वये कारवाई करण्यात आली, दारुबंदी कायद्यान्वये १ इसमावर कारवाई करण्यात आली तसेच ०१ ऑकेस्ट्रा बारवर कारवाई करण्यात आली.










---------------000000-----------------